



बालमित्र आणि त्या वयोगटातील मुले हा दत्त आपटे यांच्या मनातील अेक मअू हळवा कोपरा होता. त्यांच्या पाहण्या-वाचण्यात मुलांसाठी प्रकाशित होणारी अिंग्रजी पुस्तके असत. ती पाहिल्यावर अशी मजेदार पुस्तके 'आपल्या' मुलांसाठी असायला हवीत, या भूमिकेतून त्यांनी मराठी मुलांच्या मनांस रिझविणारे हे पुस्तक लिहिले. सभोवतीच्या मुलांच्या परिचयातील हे प्राणी चालता बोलताना व मुलांसारख्याच खोड्या करताना वाचून किशोरवयीन वाचकांस मौज वाटेल.

निरनिराळ्या पशूपक्ष्यांचे स्वभाव, त्यांच्या आवडीनिवडी पाहून मुलांना त्यांच्याच सवंगड्यांची आठवण होअील. या प्राणीगावातील नमुने मुलांना आपल्या सभोवतीच पाहायला मिळतात. फार काय, मुलांना तर आपण त्या विशिष्ट प्राण्यांच्या जागी स्वतःचीच कल्पना करून पाहता येअील, अितकी त्या प्राणीजगाशी ती तद्रूप होतात.


*काही व्यावहारिक सोय, किंवा शिक्षकी पेशाची बंधने अशा कारणानी असेल, पण काही पुस्तके दत्त आपटे यानी अन्य काही नावानी प्रसिध्द केली आहेत; त्यापैकी हे पुस्तक. त्यांच्या पत्नी अुषा आपटे यांचे नाव लेखिका म्हणून त्यांनी दिले आहे. के भि ढवळे या मुंबअीच्या प्रकाशकांनी पुस्तक १९५२ साली प्रसिध्द केले.*

| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १ली मौज | ५३० |
| २री मौज | ५३० |
| ३री मौज | ५३१ |
| ४थी मौज | ५३२ |
| ५वी मौज | ५३३ |
| ६वी मौज | ५३४ |
| ७वी मौज | ५३४ |
| ८वी मौज | ५३५ |
| ९वी मौज | ५३६ |
| १०वी मौज | ५३६ |
| ११वी मौज | ५३७ |
| १२वी मौज | ५३८ |



# प्राणीगावच्या मौजा

१.



पूर्वेच्या बाजूला लाल लाल भडक सूर्याचा गोळा वर आला. कसे कोवळे कोवळे छान ऊन पडले होते! पडक्या भिंतीवर बदकू उन्हाला बसला होता आणि तोंडाने पिंगऽ पिंऽऽग करून छोटा बाजा वाजवीत होता. जवळच झाडावर बसलेला कोकीळ आऽ वासून त्याच्याकडे पाहू लागला. तिकडून आला गंप्या उंदीर तुर तुर चालत. बदकूने मनात ओळखलेच 'माझ्या बाजावर डोळा असेल स्वारीचा! घे म्हणावं देतो!' पिंग पिंगऽऽ तो मोठ्याने वाजवू लागला.

'कोण बदकू! वा रे पठ्ठे! चांगलाच पटाईत झालास की बाजा वाजवण्यात. पण पठ्ठ्या एवढ्यावरच थांबणार? जरा काही पेटी बिटी शीक. त्यातही तुझा कोणी हात धरणार नाही. चल टाक उडी, मी चाललोच आहे कावळेबुवांच्या गायनशाळेत. कर त्यांना चकीत.'

चल तर चल, हा एवढा बाजा टाकतो तो धर. मग मी टाकतो उडी.'

'बैस आता पडक्या भिंतीवर ऊन खात. माझं काम  झालं. मी निघालो.'

'अरे गंप्या! असं फसवलंस होय!'

●●●

२.

बदकूला आता एकच विचार: 'गंप्याचा सूड कसा घ्यायचा?' आणि आलीच ती संधी त्याला एक दिवस!

कुट् कुट् करून आपल्या चिमुकल्या दातांनी गंप्या नारळ फोडण्याचा प्रयत्न करीत होता. त्याला आतले गोड गोड खोबरे चापायचे होते. हीऽ हीऽऽ तिकडून येणारा बदकू त्याला हसला, 'का रे बदक्या, हसायला काय झालं?'

'बेट्या नारळ असा फुटत असतो होय. जा वर आणि माडीवरील खिडकीतून सोड खाली. फरशीवर आपटला की फट् ऽ झालेच म्हणून समज दोन तुकडे!'

'खरंच की रे!' गंप्या वर जाता जाता म्हणाला.

सर ऽ ऽ फट्

गंप्याने सोडलेला नारळ फरशीवर आपटून त्याचे तुकडे तुकडे झाले. गंप्या धावतच खाली आला, पण...  खोबरे घेऊन बदकू केव्हाच पसार झाला होता.

●●●

३.

श्री. मोरोपंतांच्या बंगल्याच्या बागेत असलेल्या आंब्याच्या झाडाला यंदा खूपच आंबे लागले होते. पाडाला आल्याकारणाने त्यांना आता शेंदरी, पिवळा, तांबूस असे विविध रंग आले होते. एवढी महत्वाची गोष्ट गंप्या अगर बदकू यांच्या नजरेतून सुटणेच शक्य नव्हते. दोघेही डोके खाजखाजवून आंब्यावर कसा हात मारावा याचा विचार करीत होते. बंगल्यावरून दोघांच्याही दहा पाच चकरा रोज होत, पण दोघेही एकमेकांना आपला बेत कळवीत नसत. जेव्हा जावे तेव्हा कुहूऽऽ कुहूऽऽ करीत कोकीळ माळी आंब्याच्या झाडाभोवती वावरताना दृष्टीला पडे. 'या बेट्याचे डोळे मिटविल्याशिवाय आंब्याना आपला हात लागत नाही.' गंप्या व बदकू असे मनात म्हणत व दोन दिशांनी दोघे निघून जात. दोघांच्या मनात एकदम एकच विचार आला.

'रात्रीच्या सुमाराला त्या काळकुंद्र्या कोकीळाची वटवट थांबली की बागेत शिरून आंब्यांना हात घालायचा.'

चंद्रोदयाला अजून थोडा अवकाश होता. बागेत चांगलाच अंधार होता. मोरोपंतांचे आत मुलांबरोबर गप्पा मारीत जेवण चालले होते. गंप्या हळूच बागेत शिरला. तो काय! बदकू केव्हाच कोपऱ्यातील कलमी आंब्याच्या झाडावर बसून आंबे खिशात भरीत होता. गंप्याला आता विलंब करणे शक्यच नव्हते. 'अरे बदक्या, असं काय?' म्हणतच तो झाडावर चढला. पूर्वेच्या बाजूने भला मोठा चंद्राचा गोळा वर आला. त्याचा सुंदर प्रकाश झाडाच्या शेंड्यावर पडला.

'घूऽऽ हूऽऽ हुऽऽ' जवळच असलेल्या लिंबाच्या दाट पानात आतापर्यंत दडून बसलेल्या घुबडाने जागे होऊन आपली आरोळी ठोकली.

गंप्याच्या अंगावरील केस ताठ उभे राहिले. हातापायांना कापरे भरले. अंगाला घाम सुटला. तो धपकन् खाली पडला. घुबडाने आपल्या बटबटीत डोळ्यांनी एकदा त्याच्याकडे पाहिले मात्र, गंप्या जीव घेऊन पळत सुटला व बंगल्यात शिरला. मोरोपंत नुकतेच जेवण आटपून बाहेर येत होते. त्यांना जाऊनच तो थडकला.

'कोण गंप्या? आणि रात्री? अरे झालं काय तुला? इतका भ्यालास का?'

'भू ऽ ऽ भू ऽ....त्... च ऽ च चोऽरऽ' गंप्या ओरडला व बागेतील आंब्याच्या झाडाकडे बोट दाखवू लागला. मोरोपंत बाहेर येऊन पाहातात तो काय! बदकू झाडावर अंग चोरून बसलेला. बिचारा मुद्देमालासह सापडला.

बदकूचे अंग दुसऱ्या दिवशी चांगलेच ठणकत होते. पंतांनी त्याचा चांगलाच समाचार घेतला होता. गंप्याने चोर पकडून दिल्याबद्दल मोरोपंतांनी त्याला काही निवडक आंबे बक्षीस दिले. मुद्दाम बदकूपुढून आंबे चोखत जाताना गंप्याला आनंद वाटला.

बदकू मनात म्हणाला, 'पाहून घेईन बच्चाजी केव्हा तरी!'

●●●



४.

प्राणी गावचे शिपाई 'टिपोजी' मनूमावशीने दिलेले दूध पीत उभे होते. मोठे हुशार शिपाईदादा होते ते. पहाऱ्यासाठी म्हणून गावाच्या ज्या ज्या भागात ते हिंडत त्या त्या भागात चोरीचे नाव नको मुळी आणि त्यामुळे त्यांची चंगाळी चाले. बहुतेक ते जातील तेथे त्यांना 'या बसा खा प्या' होईच. दुधाचा व खव्याचा आस्वाद घेऊन टिपोजी बाहेर पडले मात्र... काय आश्चर्य! दिवसा ढवळ्या चोरी आणि ते ज्या घरी ताव मारून आले होते तेथेच? त्यांनी सहज वर पाहिले. मनूमावशीच्या घरात खिडकीतून शिरलेल्या चोराची शेपटी अजूनी बाहेर दिसत होती.

'बरं आहे बच्चाजी, दिवसा ढवळ्या आणि माझ्या देखत चोरी काय? दाखवतोच इंगा काय आहे तो.' टिपोजी गुरगुरले. कोल्होपंत चोरपावली आत घुसले असावेत हे त्याने शेपटीवरून ओळखले.

'मनूमावशी, मनूमावशी, आत जाऊन चोराला बुजवा. बाहेर उडी टाकताच मी त्याला पकडलंच म्हणून समजा!'

कोल्होबांनी चोरकानांनी हा संवाद केव्हाच ऐकला. पोलिसदादा खाली उभे असल्याचेही त्यांनी हळूच पाहिले, पण एवढ्याने ते डगमगणार होते थोडेच!

मनूमावशीच्या घरी मारलेल्या डल्ल्याचे एक गाठोडे करून त्यांनी धाप्‌दिशी सडकेवर उडी मारली व टिपूअण्णाना दाद न देता एकदम धूम ठोकली. टिपोजी त्यांच्या वेगापुढे चाटच पडले.

'भोऽ भोऽ चोर चोर' ते ओरडले.

कोल्होबांनी खांद्यावर गाठोडे टाकून धूम ठोकली. टिपोजी मागून धावू लागले. 'थांबवा, थांबवा, चोर थांबवा.'

कोल्होबाना लुटीचा मोह सोडवेना. प्राणीगावचे बहुतेक लटांबर आता त्यांच्या मागे लागले होते. कोल्होबानी बहुतेक सर्वांनाच कधी ना कधी गंडा घातला असल्याने आता त्यांची गय करण्यास कोणीच तयार नव्हते. आज स्वारी मुद्देमालासह सापडणार होती.

सारा प्राणीगाव कोल्होबांच्या मागे लागला. या साऱ्या गर्दीच्या कचाट्यातून आपला मागमूसही लागू न देता निसटणे कोल्होबांना जरा कठीणच वाटू लागले. काही ना काही युक्ती केल्याशिवाय या प्रसंगातून पार पडणे कठीणच! गाठोडे टाकून द्यावे तर मग इतक्या उसाभरीचा उपयोग काय?

पाठीवरील गाठोडे कोल्होबांचा घात करणार असे दिसू लागले. मागची मंडळी जवळ जवळ येऊ लागली होती. त्यानी एका बोळात हळूच प्रवेश केला. डुकरोजी सबंध रस्ता अडवून घराला रंग लावीत होते.

'या डुकऱ्याला वाटेत आडवा पाडून पळ काढला म्हणजे मोडेल बराच वेळ, आपल्या मागल्या लोकांचा.' कोल्होबांनी मनात विचार केला व शिडीला धक्का देऊन मधून मुसंडी मारली.

डुकरोजी शिडी व रंगसाहित्य यांसह धाडकन् खाली बोळात आडवे पडले. आय्‌ऽआय्‌ऽय्, ड्रक ड्रक, ते कुंथले आणि बेशुद्ध झाले. कोल्होबा खुशीत पळाले, पण त्यांना कोठे माहीत होते, डुकरोजींनी त्यांच्या अंगावर सांडलेला रंग त्यांच्या मागोमाग ठिपकत होता.

टिपोजी बोळात आले. वाटेत डुकरोजी आऽ वासून रंगात पडलेले दिसले.

'चक्‌ऽ चक्‌ऽ! आता थांबणं भागच आहे. डुकऱ्याला कितपत लागलं आहे कोण जाणे? डॉ. गिधडोजीकडे त्याला पाठवणं भाग आहे.'

कोल्होबा एव्हाना पार निसटले होते. दृष्टीच्या टप्प्याच्या बाहेर गेले होते. टिपोजींनी डुकऱ्याला मागील मंडळींच्या स्वाधीन केले व रंगाच्या ठिपक्यांवरून कोल्होबांचा माग काढण्यास सुरुवात केली.

कोल्होबा आपल्या घरात येऊन खुशीत बसले होते. मनूमावशीच्या घरी सापडलेला खवा त्यांनी केव्हाच मटकावला होता. दमणूक झाल्यामुळे जरा आराम करण्याच्या विचारात ते होते. त्यांनी आपली इंग्लिश पद्धतीची चिलीम भरून झुरके मारण्यास आरंभ केला. इतक्यात टक् टक् करून त्यांच्या गुप्तघराचा दरवाजा कोणी तरी ठोकला. कोल्होबा दचकलेच.

दरवाजा उघडून टिपोजी सरळ आत आले. रंगाच्या खुणांनी त्यांना थेट कोल्होबांच्या घरापर्यंत आणून सोडले होते. 'कोल्होबा, आपण चोर आहात. मी तुम्हाला कैद करीत आहे.' टिपोजी गुरगुरले.

हल्ली कोल्होबा प्राणीगावच्या तुरुंगात खडी फोडीत आहेत.

टिपोजी आता तेथे जमादार आहेत.

●●●

५.

कोल्होबांची चोरी पकडल्यापासून टिपोजी जरा जोरातच होते. प्राणीगावात आपणापुढे कोणाची लुच्चेगिरी चालणार नाही असे ते आपल्या मिशांवर ताव मारून सांगत. त्यांची ही पोलिसी घमेंड कशी जिरवावी याची चिंता गंप्याला लागून राहिली होती. आंब्याच्या प्रकरणापासून बदक्या जरा रागातच होता, त्यामुळे गंप्याला जरा चुकल्या चुकल्यासारखे झाले होते. टिपोजीची खोड काढायची झाल्यास बदक्याची मदत घ्यावी लागणार हे तो ओळखून होताच.

'बदकू!'

'गंप्या, तुझ्याबरोबर माझी बोलण्याची इच्छा नाही!'

भल्या सकाळी उठून हाक मारावयास आलेल्या गंप्याला बदकू जरा रागानेच म्हणाला, 'हे बघ बदकू, झालं ते झालं, पण जरा टिपोजीची गंमत करूया की. स्वारी हल्ली जरा घमेंडीत आहे रे! कुणाच्या बागेत शिरायची म्हणून सोय राहिली नाही.' 'फिरून मला मार खायला लावण्याचा विचार आहे गंप्या तुझा. पण याद राख हं.'

'नाही रे नाही. बघ तरी. फक्त टिपोजीची चांगली खोड काढूया म्हणतो मी. ठरलं तर?' 'ठीक आहे'.

'राम राम टिपोजी. अहो काय सांगू! सांबऱ्याच्या मळ्यात चोराने नुसता धुमाकूळ घातला आहे. त्याने मला मुद्दाम आता तुमच्याकडे वर्दी द्यायला पाठवलं आहे,' बदकू टिपोजींना गाठून अदबीने म्हणाला.

'मळयात चोरी आणि ती कसली?'

'सारा ऊस खाऊन टाकण्याची पाळी आणली आहे चोराने आणि चोर तर हाती लागत नाही. रात्री उसात शिरतो, ऊस खातो नि पहाटे पसार!'

'चल पाहू मळ्याकडे. तुमचे मेंदू बथ्थड. या चोरांच्या वाटा तुम्हाला नाही कळणार!' बदकू टिपोजींना घेऊन मळ्याकडे निघाला. गंप्या मागावर होताच. कुंऽ ई ऽऽ कुऽऽ ईऽऽ हं ऽऽऽ धो ऽऽऽ! मळ्यात मोट चालू होती. उसाला पाणी देण्याचे काम चालू होते.

उसाच्या सभोवार हिंडून टिपोजी तपास करीत होते. ओल्या मातीवर उठलेल्या पावलांच्या खुणांचे निरीक्षण करीत होते. 'बस्स. आज रात्री चोर पकडतो,' टिपोजी हसून म्हणाले. सांबऱ्या खूश झाला. बदकूही हसला.

रात्री चांदणे पडण्याच्या सुमारास टिपोजी हळूच मळ्याला लागून असलेल्या झाडीपाशी आले व अंधारी जागा पाहून दबा धरून बसले. गंप्या आणि बदकू आधीच एका झाडावर ठाण मांडून गूपचूप बसले होते. थोड्याच वेळात निवडुंगातून खस खस आवाज आला व सायाळदादा उसावर ताव मारण्यासाठी बाहेर पडले.

सप सप आवाज करीत त्यांनी उसाचा फड गाठला. टिपोजींना वाटले मुंगुस खाऊन माजले आहे. त्यांनी हटकले, 'ए ऽऽ मुंगश्या! चोरा! उभा राहा. ऊस खातोस काय? थांब, आता नेतो तुला पकडून आणि लोळवतो चांगला.'

'ठिस् ऽ ठिस्ऽ ऽ' सायाळदादा उद्गारले.

टिपोजी त्यांची मानगूट धरणार, तो काय? सायाळदादांनी आपल्या अंगावर आतापर्यंत पाडून ठेविलेले काटे ताठ उभे केले व त्यांचा टिपोजीवर असा वर्षाव केला की ज्याचे नाव ते.

पाचच मिनिटात टिपोजींचा भीष्माचार्य झाला. ते जमिनीवर लोळू लागले. त्यांचे अंग काटेरी निवडुंगाच्या फणीप्रमाणे दिसू लागले.

सायाळदादा उसात शिरून फराळाला लागले. गंप्या आणि बदकू हसू बाहेर पडू नये म्हणून धडपडत होते.

'राम राम. काय सापडला का चोर रात्री?' बदकूने सकाळी उठल्याबरोबर अंथरुणात कुंथत पडलेल्या टिपोजींना मिस्किलपणे विचारले.

'तुमचे ते खंडोबा कुठे पळाले? मघाशी फार मोठ्या गोष्टी करीत होते. या म्हणावं आता मोठे मासे धरायला.' बगळू बदक्याला ऐटीत म्हणाला.

फड् फड् करीत खंड्या आलाच इतक्यात तेथे. बगळोबांना तेथे पाहून तो थंडच झाला आश्चर्याने. त्याचे पंख ताठच झाले. तो नुसताच पटकन् पाण्यात पडायचा, पण निभावले!

खजील झालेल्या बदकूलाही खंड्याची ती केविलवाणी स्थिती पाहून हसू आले. 'हसतोस काय? या ढोंगी बगळूची खोड मोडलीच पाहिजे,' खंड्या रागाने पुटपुटला. इतक्यात त्याच्या तीक्ष्ण नजरेला बगळूच्या पुढे पाण्यात काहीतरी

हलताना दिसले. त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. त्याने जो सरळ सूर मारला तो थेट बन्या कासवाच्या डोक्यावरच! 'स्! हाय्' खंड्याच्या तीक्ष्ण चोचीचा मार डोक्यावर बसताच बन्या ओरडला व सर्व अवयव आखडून त्याने पाण्याचा तळ गाठला. बगळू गटांगळ्या खाऊ लागला.

'बगळ्या, पाणी पी राजा! हे मासे पचायला जड असतात,' बदक्या म्हणाला. 'दोस्ताला वर हाक मार जरा म्हणजे आणखी एक सूर मारतो त्याच्या बोडक्यावर,' खंड्या म्हणाला व दोघेही हसू लागले.

●●●

६.

बगळू आज सकाळी लवकर उठून नदीवर आला होता. पाण्याकडेला त्याचे ध्यान चालू होते. मधून मधून मासे मटकावण्याचा कार्यक्रमही चालू होताच. बोटभर पाण्यात येणारे मासे ते कितीसे मोठे असणार?

'काय बगळोबा! का लागलाय् टीचभर पाण्यात नाचायला. या असे भर पात्रात.' बदक्याने बगळूला खिजविले व भर भर पोहत जाऊन तळ्याचा मध्य गाठला. तळ्यातील संथ पाण्यावर तो पोहत असताना मध्येच डुबऽकन् पाण्यात बुडी मारून एखादा भला मोठा मासा गट्ट करी.

'ही ऽ ऽ ही ऽ'

बगळूची माशामागे चाललेली धावाधाव पाहून बदकू हसला.

ऐन डोहाच्या मध्यावर सूर मारून मासे पकडणाऱ्या खंड्यालाही बगळूची कीव आली. 'काय बगळोबा, काय लागतो आहे का एखादा मासा हाती?'' त्यानेही बगळूला खिजविले. बगळ्या मनात चांगलाच चिडला. पण उपयोग काय? खोल पाण्यात जाऊन तो मोठा मासा धरणार कसा?

बन्या कासव जवळच हातपाय आखडून उन्हात पडला होता. बगळूची चाललेली चेष्टा त्याला फारशी आवडली नाही. त्याने आपले डोके हळूच वर काढले व बगळूला शू ऽ शू ऽऽ करून हाक मारली.

'तू राहा माझ्या पाठीवर उभा. मी पाण्यात बुडून पोहत जातो नदीच्या मध्यावर, आणि तू तेथे खुशाल मासे धर. मग येऊ हळूच परत, म्हणजे जिरेल या दोघांची चांगली. 'बन्याची युक्ती बगळूला फारच पसंत पडली.

थोड्याच वेळात बगळोबा डोहाच्या मध्यावर मासे पकडताना दिसू लागले. 'काय रे बदक्या, फार वटवट लावली होतीस मघाशी! तुला काय वाटलं मला पोहता येत नाही होय?' बदक्या चाटच पडला. बिचाऱ्याला आऽ वासून पाहात बसण्याखेरीज इलाजच नव्हता.

●●●

७.

ऊन कसे लख्ख पडले होते. बदकू बाहेरच ओसरीवर बसून पंख्याने वारा घेत होता.


'काका, काका, आम्हाला पोहायला शिकवता?' सुटीत गंप्याकडे आलेले त्याचे दोन धाकटे मावसभाऊ तेथे येऊन त्याला विचारू लागले.

'तुम्ही काय पोहणार रे कार्ट्यांनो! जा मुकाट्याने घरी. नाही ती ब्याद कुणी पत्करावी!'

'आम्हाला थोडं थोडं पोहायला येतं आहे, पण जरा उड्या बिड्या मारायला शिकवा ना!'

'मोठे उड्या मारणार! जा बाबांनो जा घरी. उगीच नका त्रास देऊ मला उन्हाचा.'

'गंपूदादाने उगीच थाप मारली असेल. बदकूकाकांना मुळीच पोहायला येत नसेल नि मग ते उड्या काय मारणार आणि आम्हाला काय शिकविणार?'



'काय रे काटर्यांनो, मला पोहायला येत नाही होय? व्हा पुढे तळ्यावर. हा आलोच मी पाठोपाठ.'

गोट्या आणि सद्या आनंदाने उड्या मारीतच तळ्याकडे निघाले. जाता जाता त्यांच्या चिमुकल्या डोक्यात बदकूची खोडी कशी काढावी याचे विचार चालले होते. तलावापाशी येताच त्यांना एक युक्ती सुचली. त्यांनी उड्या मारण्यासाठी तेथे ठेवलेली फळी ज्या ठिकाणी पाणी अगदी थोडे होते अशा ठिकाणी उचलून नेऊन ठेवली. इतक्यात बदकोबा आलेच.

'काका, एक सूर तर मारून दाखवा.'

'ठीक आहे. पोरांनो, द्या लक्ष.' बदकू फळीवर चढता चढता म्हणाला.

'हे पाहा, एक, दोन ती ऽन.' 'गडच्' बदकूने सूर टाकताच आवाज झाला. त्याचे डोके गाळात घुसले होते व तंगड्या वर हवेत तरंगत होत्या. पुष्कळ धडपड करून बदकूने आपले गाळाने बरबटलेले तोंड वर काढले. फळीवर उभे राहिलेले सद्या व गोट्या आपले हसू दाबीत होते व जवळच चिखलात बसलेले बेडूकमामा ड्रॉं ऽऽ व ड्रॉं ऽऽ करून त्याला हिणवीत होते.

●●●

८.

'फुलपाखरे फुलांवर बसून मध खाऊन टाकतात व मधमाशा फुलांतील मध गोळा करून साठवून ठेवितात.' राघ्या मास्तराने शाळेत सांगितलेली ही माहिती पप्याने लक्षात ठेविली होती. झिप्र्या अस्वलाच्या पोराने त्याला मधाची चटक लावल्यापासून पप्याला मधमाश्यांचा साठा हस्तगत करण्याची ओढ लागली होती. तो सारखा त्या शोधात होता.

गुं ऽऽ ईऽ गुं ऽऽ ईऽऽऽ पप्याने एक दिवस शाळेच्या मागे असलेल्या बगीचात आवाज ऐकला. कोपऱ्यातल्या हिरव्यागार लिंबाऱ्याच्या डहाळीला एक मोहोळ लागले होते.

'चक्, येथे मध चोरून साठविता काय? थांबा, करतो काम आज मधल्या सुट्टीत,' पप्या पुटपुटला आणि गुपचुप वर्गात बसला.

राघ्या मास्तरचा डोळा चुकवून त्याने कुमार झिप्र्याला खुणा करून आपला शोध कळविलाच.

'ठण् ठण्' मधल्या सुटीची घंटा होताच पप्या व झिप्र्या हळूच बागेत शिरले. झाडावर चढून पोळे काढण्याची कामगिरी झिप्र्याने पत्करली. कारण त्याचा तो पिढीजात धंदा होता.

घुं ऽ ऽ ऽ ई' पाचच मिनिटात मोठा आवाज होऊन हजारो माशा उठल्या व त्यांनी झिप्र्यावर हल्ला केला. पण त्याच्या दाट केसांमुळे त्यांचा इलाज चालेना. मान पायात दडवून झिप्र्या खुशाल फांदीवर बसून होता. माश्यांनी आपला मोर्चा आता पप्याकडे वळविला.

पप्याला पळता भुई थोडी झाली. त्याने आरडत-ओरडत थेट राघ्या मास्तराचे 'हपीस' गाठले.

राघ्या मास्तर पप्याला रागे भरणार, तोच हपिसातही 'घुं ऽ ऽई ऽऽ आवाज आला. राघ्यानेही पण 'स् हाय्' करीत पळ काढला. शाळा सुटली पण सर्वांना पळता-पळता पुरेवाट झाली.

पप्याचे सर्व अंग सुजले होते. त्याला ताप आला होता. त्याच्या समाचारास आलेला झिप्र्या म्हणाला, 'मध काय गोड होता म्हणून सांगू.'

●●●

९.

शाळा सुटताच आज डुकऱ्याची दोनही कारटी घराकडे न जाता सरळ गावाबाहेर चालती झाली. सांबऱ्याच्या मळ्यात खूप मका लाविल्याची वार्ता त्यांच्या कानी आली होती. तेथे जाऊन मक्यावर ताव मारून मग सावकाश अंधार पडल्यावर घरी येण्याचा त्यांचा मानस होता. आज सांबऱ्याही गावात वसतीला राहाणार असल्याची कुणकुण त्यांना लागली असावी.

'दादा, चल बुवा परत, आपण तर दमलो,' वाटेतच बैठक मारून धाकटा दगड्या म्हणाला.

'अरे चल, मळा तर जवळ आला. कणसं खाऊन तिथेच घेऊ जरा विश्रांती.' त्याला धीर देत थोरला धोंड्या म्हणाला.

मळ्यात जाईपर्यंतच दिवस बुडून काळोख झाला. पण मका दिसताच दगड्या-धोंड्या शुद्ध वेडे बनले. मळ्यात आज जरा सामसूमच दिसत होती. मक्यात घुसून त्यांनी यथास्थित चरींदा लाविला. इतक्यात कोणाचीशी चाहूल लागली. खुराड्यांतील कोंबड्या कक् ऽ कक् ऽ करून ओरडू लागल्या. धोंड्याने कानोसा घेतला. त्याला चांगलाच घाम सुटला. नाकाने वस् वस् आवाज करीत लांडगोबा काही तरी हुडकीत होते. त्यांना कसला तरी वास आला होता.

धोंड्या चाणाक्ष होता. लांडगोबाला आपलाच वास आला आहे हे त्याने ओळखले. आज कोंबड्या सोडून ते आपणाला गाठणार अशी भीती त्याला वाटू लागली. दगड्या तर घामाने डबडबला होता. सांबऱ्याच्या घराचा आश्रय मिळाला तरच वेळ निभावणार होती.

धोंड्याने त्याला बकोटीला धरून उठविले व हळूच मक्याच्या शेतातून बाहेर पडून मळ्यातील सांबऱ्याच्या घराकडे धूम ठोकली. सांबऱ्या नुसती दाराला कडी लावूनच बाहेर गेला होता, हे सुदैवच म्हणावयाचे. आत जाऊन दगड्या-धोंड्यांनी धाडकन् दार लावून घेतले. तोच लांडगोबा तेथे येऊन थडकलेच. शिकार मिळविण्यासाठी त्यांनी घराभोवती चकरा मारण्यास आरंभ केला.

सांबऱ्याचे घर रिकामेच पडले होते. घराला भले मोठे धुराडे होते. ते पाहून फिरून धोंडोबा घाबरले. लांडगोबांनी तेथून आत उडी मारण्याचा प्रयत्न केला तर? त्याने घाईने एक भला मोठा टोप पाण्याने भरून चुलवणावर उकळत ठेविला. दगड्या बघत होता, त्याला काहीच कळेना. इतक्यात बाहेर हिंडून कंटाळलेले लांडगोबा छपरावर चढल्याची चाहूल लागली. दगड्या-धोंड्याला भेटण्यासाठी त्यांचा जीव कासावीस झाला होता.

थोड्याच वेळात लांडगोबा धुराड्यातून आत डोकावताना दिसू लागले. त्यांच्या तोंडाला पाणी सुटले, तर खाली पाण्याला उकळी फुटली. त्यांनी सहाण्यांतून आत उडी टाकली नि काय! डुबू! 'आ ऽ हाय ऽऽ' लांडगोबा तडफडू लागले. दगड्या-धोंड्या दार उघडून बाहेर पडणार तोच दारात मळ्यात वसतीसाठी आलेला सांबऱ्या हजर!

'तुमच्या कोंबड्या पळविणाऱ्या लांडगोबाची शिकार केली आम्ही'. धोंड्या सांबऱ्याला खूश करण्यासाठी म्हणाला.

'शाबास पठ्ठे, आता थांबा, इथेच आपण मक्याची कणसं खाऊ.' सांबऱ्या त्यांना शाबासकी देऊन म्हणाला.

●●●

१०.

मन्या बोक्याचे 'विठ्ठल विश्रांतीगृह' म्हणजे राघ्या मास्तराच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे आवडते स्थान! तेथे लोणी-पाव, खवा, बर्फी वगैरे पौष्टिक जिन्नसच फक्त मिळत. विद्यार्थ्यांनी चहा-चिवडा खाऊ नये या मताचा मन्या होता. गंप्या, बदकू आणि मंडळी विश्रांतीगृहापुढे उभी राहात व पाट्या वाचीत-

'ताजी बर्फी १ आणा प्लेट'

'बटाट्याची सुकी भाजी व पुरी'; पण खिशात पुरेसे पैसे नसल्याने पुढे जात. एकदा चंद्या ससा त्यांच्या देखत ढेकर देत बाहेर आला. 'आजचा कोबी-वडा फारच फर्मास आहे,' गंप्याला उद्देशून तो म्हणाला.

'बदक्या, विठ्ठल विश्रांतीगृहाचा एकदा चांगलाच समाचार घेतला पाहिजे रे!'

'इतके पैसे कुठून आणायचे? पोटभर हात मारायचा तर लागतील दोन रुपये सहज!' बदकू निराशेने म्हणाला.

कावळोबा काळे त्यांचा संवाद मान वाकडी करून ऐकत होते. आपल्या टरक्या डोळ्याने त्यांच्याकडे पाहात त्यांनी 'क्रॉव' करून त्या दोघांना हाक मारली.

'आज मन्याने 'कामासाठी हुशार पोऱ्या पाहिजे' म्हणून पाटी लावली आहे.' कावळ्या म्हणाला. 'मग तुझं म्हणणं काय?' बदकू व गंप्या एकदम म्हणाले.

'मी उद्या तिथे नोकरी धरणार.'

'मग धर जा. आम्हाला काय सांगतोस?' ते दोघे जरा त्रासिकपणे म्हणाले.

'तुम्ही दोघे दगड आहात!' कावळ्या ओरडला, 'उद्या दोन-चार आणे खिशात टाकून विश्रांतीगृहात या, म्हणजे दाखवतो मजा. कोटांना मोठाले खिसे असूद्यात. उद्या दुपारी जाऊ वनभोजनाला!'

गंप्याला व बदकूला साधारण अंदाज आला. 'भले! काळ्या, पाहू तरी काय करतोस ते,' असे म्हणून ते आनंदाने पुढे सटकले.

सकाळी विश्रांतीगृहात गर्दी करणाऱ्या गिऱ्हाईकांना 'विठ्ठल विश्रांतीगृहा'चा नवा पोऱ्या काळ्या भराभर जिन्नस नेऊन देताना दिसू लागला.

'एक इस्सम दो ऽन् आणे ऽ' तो मध्येच ओरडे.

थोड्याच वेळाने बदकू व गंप्या आले आणि एका अंधाऱ्या कोपऱ्यातील टेबलापाशी जाऊन बसले.

कावळ्याने आणून दिलेल्या जिनसा बेता-बेताने त्यांच्या खिशात गडप होऊ लागल्या. तिघांची भरपूर बेगमी झाल्यावर विश्रांतीगृहाचे हे नवे गिऱ्हाईक बाहेर पडले.

'दोन इस्सम चा ऽऽर आणे ऽऽ' काळ्या तारस्वरात ओरडला. घाईत असलेल्या मन्याने बदक्याने दिलेली पावली पेटीत टाकली व दुसऱ्या आरोळीची तो वाट पाहू लागला.

ऐन दुपारची वेळ. काळ्या, बदक्या आणि गंप्या नदीकिनारी एका गार झाडाखाली बसून फक्त चार आण्यात 'विठ्ठल विश्रांतीगृहा'त पैदा केलेल्या खमंग पदार्थांवर ताव मारीत बसले होते.

'टरके लोक मोठे कावेबाज असतात नाही?' खव्याची बर्फी चघळीत गंप्या म्हणाला.

'मन्याला आज चांगलाच नफा झाला असेल.' लोण्याने बरबटलेला पाव तोंडीत काळ्या उद्गारला.

'उद्या तू कुठे नोकरी धरणार?' बदक्याने मिटक्या मारीत विचारले.

●●●

११.

राघ्या मास्तरच्या हपिसात पप्याने मधमाशा आणून सोडल्यापासून, राघ्या मास्तरने पप्यावर चांगलाच दात धरला होता. तो त्यास येता जाता बाकावर उभे करी आणि काही तरी खुसपट काढून 'जा की, मध खायला हवा नाही का? उनाड कार्टं कुठलं?' म्हणून खिजवी.

बिचाऱ्या पप्याला मात्र याचा चांगलाच उपद्रव होई. गंप्या, बदकू, झिप्र्या त्याला खिजवीत ते निराळेच.

चिडलेल्या पप्याने मास्तरचे ढोंग एकदा बाहेर आणण्याचा निश्चय केला. वांडपणाबद्दल खरपूस मार खाणाऱ्या मन्या मर्कटानेही त्याला या कामी मदत करण्याची हमी दिली.

दुसऱ्या दिवशी वर्गात येताच राघ्या मास्तरने नेहमीच्या सवयीप्रमाणे, डोळे गरगर फिरवीत एकदा साऱ्या पोरांवर नजर टाकली. मन्या मर्कटाची फुगलेली दोनही गालफडे

त्याच्या तत्काळ लक्षात आली. 'मन्या, चल इकडे!' राघ्याने कर्कश आवाज काढून त्याला फर्मविले व वर्गात त्याची चक्क झडती घेतली.

ओली मिरची, मीठ, वगैरे लावून खमंग तयार केलेल्या पाडाच्या पेरवाच्या कित्येक फोडी भराभर मन्याच्या खिशातून बाहेर पडू लागल्या.

हा मालमसाला पाहून राघ्याच्या तोंडाला चांगलेच पाणी सुटले. 'गुट् ऽ' करून त्याने आवंढा गिळला व 'कारट्या! वर्गात खातोस?' म्हणून मन्याला दम देऊन जप्त केलेल्या फोडी हपिसात नेऊन ठेवून देण्याचा हुकूम गंप्याला दिला.

घण्-घण्-घण् मधल्या सुट्टीची घंटा झाली आणि पोरांनी अंगणात मारागुट्टीचा डाव मांडला.

राघ्या मास्तर हपिसाच्या दारात उभा राहून गंमत पाहात होता. थोड्या वेळाने डाव चांगलाच रंगलेला पाहून तो हळूच आत गेला. राघ्याला आत जाऊन दोन तीन मिनिटे होतात न होतात तोच मन्याने डोळे मिचकावून चेंडू सरळ हपिसात भिरकावला.

गुंउऽऽ गुंउऽऽ करीत चेंडू हपिसात शिरताच त्याच्या पाठोपाठ सर्वच कारटी हपिसात शिरली. मन्या, पप्या आघाडीवरच होते. राघ्या मास्तर जप्त केलेल्या पेरवाच्या फोडी चापीत बसला होता.

'क ऽ क ऽ काय ऽ रे?' तो बोबड्या भाषेत म्हणाला.

'च् ऽ ऽ च ऽ चें ऽऽ डू' मन्या म्हणाला व राघ्याच्या भरलेल्या गालफडाकडे पाहून हसत हसत सर्वच कारटी बाहेर पळाली.

●●●

१२.

आज सकाळी नेहमीप्रमाणे बदकू नदीकिनारी आला आणि त्याला एक चमत्कार दिसला. तुरुंगाची हवा खाऊन आलेले कोल्होबा नदीतटाकी उन्हाला पाठ लावून बसले होते व मिटक्या मारीत काही खात होते.

'काय कोल्होबा, फिरून रात्री कुठे डल्ला मारलात वाटतं?' बदकूने साळसूदपणे विचारले.

'काय रे बदक्या, चोरी केल्याशिवाय मला काही खायला मिळतच नाही, असं वाटतं का रे तुला?' तोंडातील पदार्थ अघळ पघळ चघळीत कोल्होबा म्हणाला.

'पण फराळ कसला चालला आहे ते तर कळूदे.' बदकूने चौकसपणे विचारले.

'हे बघ' असे म्हणून कोल्होबाने टेकाडावरील एका बिळात आतापर्यंत खुपसून ठेवलेली केसाळ गोंडेदार शेपटी बाहेर काढली. शेपटीच्या टोकाला असलेल्या केसांच्या झुबक्याला एक खेकडा डसला होता. 'सपक्' करून कोल्होबांनी त्या खेकड्याला जमिनीवर शेपटी झाडून आपटले व 'मचक् मचक्' करून खाऊन टाकले.

कोल्होबाची ही अजब युक्ती पाहून बदकू चाटच झाला.



'तुझ्या त्या टिप्याला सांग, शिळे तुकडे चघळण्यापेक्षा असं काही करून दाखीव.' कोल्होबा धूर्तपणाने म्हणाले.

बदकूने टिप्याकडे धाव घेतली आणि खरेच, टिप्या सकाळची न्याहरी म्हणून चौकीत शिळे तुकडे चावीत बसला होता.

'कोल्होबांनी खेकड्यावर ताव मारला आहे आणि तू बसला आहेस शिळे तुकडे चघळीत.

रागाने उसळून टिप्या म्हणाला, 'चल चल, मीही खेकडे पकडून दाखवतो तुला. आज जरा निराळी न्याहरी. आपलं काय?'

नदीवर येताच टिप्याने 'हूँ ऽऽ हूँ ऽऽ' करून काही

बिळे हुंगली व शेवटी 'हे बघ बदक्या' असे म्हणत आपली बिनकेसांची, लांडी, गुळगुळीत, वाकडी शेपटी मोठ्या खटपटीने एका बिळात खुपसली!

'भूऽऽ भोऽऽ' दुखा:ने कळवळून ओरडत त्याने टुणकन् उडी मारली. एका भल्या मोठ्या खेकड्याने त्याच्या मांसल शेपटीच्या टोकाला आपल्या पुढील आकड्यांनी गच्च पकड घेतली होती. शेपटीला लागलेल्या चिमट्याने टिप्याचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली होती.

'भोऽऽ भोऽऽ' करीत टिप्या शेपटीच्या टोकाला लटकलेल्या खेकड्याचा चावा घेण्यासाठी अंगाभोवती गरगर फिरू लागला. बदक्याची तर हसता हसता मुरकुंडी वळली.

'काय टिपोजी, कसा काय लागतो खेकडा?' कोल्होबाने दात काढीत विचारले.

●●●

## समारोप

गंप्या, बदकू शाळेच्या वाटेवर होते! मन्या मर्कटाने त्यांना वाटेतच गाठले. तो हळूच म्हणाला, 'गड्यांनो, आज माझी धडगत दिसत नाही. राघ्या मास्तर माझी खोड मोडल्याशिवाय राहाणार नाही.'

'आज शाळा चुकवून नदीवर डाव मांडू.' बदकू डोके चालवून म्हणाला.

'वाऽ वाऽ! म्हणजे शाळा चुकविल्याबद्दल आणखी मार होय!' गंप्याने बदकूची कल्पना फेटाळून लावली.

हो, ना, करीत सर्व पोरं शाळेत येऊन तर दाखल झाली. राघ्या मास्तर केव्हाच शाळेत येऊन हपिसात बसला होता. मन्या मर्कटाला चांगलाच घाम फुटला.

पण इतक्यात एक चमत्कार झाला. राघ्याच्या हपिसातून सांबऱ्या पाटील हसत हसत बाहेर पडला.

'चला रे पोरांनो, आज तुमच्यासाठी मळ्यात हुरडा काढला आहे. राघोबा मास्तरनी आज तुम्हाला सुटी दिली आहे आणि तेही येणार आहेत तुमच्या बरोबर!' सांबऱ्याचे हे आमंत्रण ऐकून पोरांनी एकच आरडा केला.

'मन्या, आज तू हवे तेवढे पेरू खा, पण फिरून चोरून मात्र नेऊ नकोस!' सांबऱ्याने मन्याला हसत हसत दटावले.

'आज सुट्टी!' गंप्या ओरडला.

राघ्या मास्तराने आज सांबऱ्याच्या मळ्याकडे सहल काढली. पोरांचा घोळका उड्या मारीत मारीत सांबऱ्याच्या मागोमाग बाहेर पडला. प्राणीगावातून बाहेर पडता पडता नदीकिनाऱ्यावर मला हे टोळके भेटले.

मुलांनो, प्राणीगावच्या सफरीत मला दिसलेल्या गंमती मी तुम्हाला सांगून टाकल्या. फिरून कधी योग आला व माझे तिकडे जाणे झाले तर आणखीही काही गंमती मी तुम्हाला जरूर सांगेन हं.

●●●